**शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव विद्यार्थिनी सहकार ग्राहक भांडार, मर्या.**
**तासगाव, जि. सांगली**

<u>उपहारगृह चालविणेचा ठेका देणे बाबत</u>

शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव विद्यार्थिनी सहकार ग्राहक भांडार, मर्या. तासगाव, जि. सांगली येथील उपहारगृह चालविणेचा ठेका देणेबाबत इच्छुकांनी दिनाक ०२/०६/२०२५ दुपारी ०२.०० वाजलेपासून ते १२/०६/२०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत ऑफलाईन पध्दतीने निविदा भरावी.

निविदा फॉम रु. १०००/-
बायणा रक्कम रु. २०००/-

निविदा मंजूर झाले नंतर रु. १,००,०००/- (अक्षरी रु. एक लाख) सुरक्षा/ अनामत रक्कम धनादेश / धनाकर्ष पद्धतीने भरावे.

**अध्यक्ष तथा प्राचार्य**
**शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन**
**विद्यार्थिनी सहकार ग्राहक भांडार, मर्या. तासगाव,**
**जिल्हा-सांगली.**

**अधिक माहितीसाठी संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळाला** https://www.grwptasgaon.ac.in/ **भेट द्यावी**

**टीप:- निविदा फॉर्म व प्रपत्रे शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव विद्यार्थिनी सहकार ग्राहक भांडार, मर्या. तासगाव, जि.सांगली येथून प्रत्यक्ष घेऊन जावेत.**

# शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव जि. सांगली या संस्थेतील उपहारगृह निविदा

(निविदा प्रक्रिया व इतर प्रपत्रांचे नमुने)

## निविदा

**विषयः-** या संस्थेतील शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव विद्यार्थिनी सहकार ग्राहक भांडार, मर्या. तासगाव, जि. सांगली उपहारगृहासाठी सेवा पुरवण्याबाबत.

## अभिव्यक्ती स्वारस्य

शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव जि. सांगली या संस्थेतील विद्यार्थीनी संख्या अंदाजे ११०० व अधिकारी/कर्मचारी यांची संख्या अंदाजे ६० आहे. त्याकरिता उपहारगृह सेवा पुरविण्याबाबत अनुभवी कंत्राटदाराकडून अभिव्यक्ती स्वारस्य निविदा मागविण्यास येत आहे. निविदाबाबतची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

निविदाबाबतची माहिती

| | |
|---|---|
| ०१. कोऱ्या निविदेची किंमत | : रु. १०००/- (नापरतावा) |
| ०२. बिनव्याजी बयाना रक्कम रुपये | : रु. २,०००/- (परतावा) |
| ०३. बिनव्याजी सुरक्षा ठेव रक्कम | : रु. १,००,०००/- |
| ०४. निविदेचा कालावधी | : दि. ०२/०६/२०२५ ते १२/०६/२०२५ |

(उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि.१ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार)

०५. निविदा सादर करावयाची अंतिम तारीख व वेळ: दिः-१२/०६/२०२५ दु. ६.०० वा

०६. निविदेतील तांत्रिक लिफाफे उघडण्याची तारीख व वेळ: दिः-१३/०६/२०२५ दु. ४.०० वा

०७. कोऱ्या निविदा मिळण्याचे व भरलेले निविदा सादर करावयाचे कार्यालय- विद्यार्थिनी सहकार ग्राहक भांडार, (शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव जि. सांगली) वसतिगृह ज्यांच्या अधिपत्याखाली येतात त्या ठिकाणी अथवा निविदा प्रसिध्द करणाऱ्या प्राधिकाऱ्याच्या स्तरावर "खरेदी समिती गठीत करुन निविदा प्रक्रियेशी संबंधित प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक राहील. (उदा. निविदा प्रसिध्द करणे, स्विकारणे, निविदेतील तांत्रिक व व्यावसायिक लिफाफा छाननी करणे, तुलनात्मक तक्ता तयार करून पात्र निविदा धारकास करारनामा करून कार्यादेश देणे इ.)

सदर निविदा शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव विद्यार्थिनी सहकार ग्राहक भांडार, मर्या. तासगाव, जि. सांगली येथे भरुन जमा करावी. तसेच टपालाद्वारे विहित कालावधीनंतर प्राप्त झालेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी.

सर्व प्रथम तांत्रिक कागदपत्रांच्या पडताळणीसाठी लिफाफा क्रमांक १ (प्रपत्र-अ व कागदपत्रे) उघडण्यात येऊन निविदेत नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत किंवा कसे याबाबत खात्री करण्यात येईल, आवश्यक कागदपत्रे सादर न केल्याचे आढळून आल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येईल. जे निविदाधारक उपरोक्त प्रक्रियेदरम्यान उपस्थित राहू इच्छितात त्यांनी वर नमूद केलेल्या ठिकाणी वेळेवर उपस्थित राहावे. लिफाफा क्रमांक (प्रपत्र- दरपत्रक) उघडण्यापूर्वी तांत्रिक लिफाफा क्रमांक या पडताळणी मध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांची, दरपत्रिकेची नियुक्त समिती मार्फत अर्हता छाननी करण्यात येईल. दोन किंवा अधिक निविदाधारकांचे दरसमान असल्यास प्रत्येकाला स्वतंत्रपणे चर्चेसाठी बोलविले जाईल व त्याआधारे अंतिम निर्णय घेतला जाईल. चर्चेद्वारे सुधारित दर निश्चित करण्याचे अधिकार उपहारगृह समितीस राहतील.

संबंधित सर्व कागदपत्रे ज्या नावे निविदा सादर केली आहे त्याच नावाने असणे बंधनकारक आहे. तसेच तांत्रिक लिफाफे उपडल्यावर नियुक्त समितीने मागणी केल्यास सर्व मूळ कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करणे अनिवार्य आहे. निविदा भरण्यापूर्वी निविदा धारकाने उपहारगृहाची पाहणी करावी, निविदा धारकास निविदा भरतांना काही अडचण असल्यास किंवा काही बाबतीत स्पष्टीकरण आवश्यक असल्यास विद्यार्थिनी सहकार ग्राहक भांडार, मर्या., शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव जि. सांगली यांच्याशी संपर्क साधावा.

कोणत्याही क्षणी निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष तथा प्राचार्य शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन विद्यार्थिनी सहकार ग्राहक भांडार, मर्या. तासगाव, जिल्हा सांगली यांना राहतील.

**अध्यक्ष तथा प्राचार्य**
**शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन**
**विद्यार्थिनी सहकार ग्राहक भांडार,मर्या. तासगाव,**
**जिल्हा-सांगली.**

**सोबत:-**

- प्रपत्र-अ
- प्रपत्र-ब
- नियम, अटी व शर्ती
- हमीपत्र
- स्वयंघोषणापत्र
- उपहारगृह चालविण्यासाठीची मार्गदर्शक तत्वे

**टीप:-** निविदा भरण्यास इच्छुक सर्व एजन्सी/ कंपनी/उमेदवार यांना सूचित करण्यात येते कि, त्यांनी प्रपत्र-अ ( संबधित कागदपत्रे) व प्रपत्र –ब (दरपत्रक) वेगवेगळया लखोट्यामध्ये (Envolope) देणे बंधनकारक आहे तसेच लखोट्यांच्या दर्शनी भागावर प्रपत्र-अ किंवा प्रपत्र-ब असे ठळक अक्षरात नमूद करावे. सर्व कागदपत्रे एका लखोट्यामध्ये टाकलेले आढळल्यास सदरील निविदा बाद करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.